# MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED

(A Government of Maharashtra Undertaking)

## Dadasaheb Phalke Chitranagari

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org

**चित्रपताका महोत्सवात मोफत चित्रपट प्रमोशन करण्याची संधी**

मराठी चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी शासनाचा प्रयत्न; मोफत प्रमोशन करता येणार!

मुंबई, दि,१९: मुंबईच्या पु.ल.देशपांडे देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे २१ ते २४ एप्रिल दरम्यान आंतरराष्ट्रीय दर्जाचा 'चित्रपताका' या मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या आंतरराष्टीय दर्जाच्या पहिल्या मराठी चित्रपट महोत्सवात, मराठी चित्रपट निर्मात्यांना आपल्या चित्रपटाचे मोफत प्रमोशन करण्याची संधी मिळणार आहे. आपला मराठी चित्रपट जास्तीतजास्त रसिक प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्यासाठी हा चित्रपट महोत्सव एक व्यासपीठ असणार आहे. यातून मोफत प्रसिद्धी निर्मात्यांना करता येणार आहे, ज्याचा अधिकाधिक फायदा मराठी चित्रपट सृष्टीला भक्कम करण्यासाठी होईल. सांस्कृतिक कार्य विभाग , महाराष्ट्र चित्रपट,रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या सयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

चार दिवसीय चित्रपटात ४१ चित्रपटांची मेजवानी रसिक प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे. या महोत्सवामध्ये प्रेक्षकांना ड्रामा, विनोदी,सामाजिक अशा विविध प्रकारचे आशयघन चित्रपट विनामूल्य पाहता येणार आहेत. त्याचबरोबर सिने रसिकांसाठी पाच परिसंवाद, मुलाखत आणि दोन कार्यशाळांचे आयोजन या महोत्सवांमध्ये करण्यात आले आहे. प्रेक्षकांना 'चित्रपताका'- आंतरराष्ट्रीय चित्रपट मोत्सवात सहभागी होण्यासाठीचित्रपताकाच्या अधिकृत संकेत स्थळावर जाऊन नाव नोंदणी करता येणार आहे तसेच पु .ल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या चौथ्या मजल्यावरील नॉनो सभागृहात ऑफलाइन पद्धतीने नोंदणी करता येणार आहे. मराठीतला पहिलाच आंतरराष्ट्रीय दर्जाचा हा चित्रपट महोत्सव आहे. मराठी रसिकांसाठी आणि कलाकारांसाठी हा महोत्सव एक विशेष मेजवानी ठरणार आहे.